# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०१८
## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

(क) **तारांकित प्रश्न.**

(ख) **सोमवार, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१८ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : "लोकलेखा समितीचा त्रेचाळीसावा अहवाल सभागृहास सादर करणे"**

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).**

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **सर्वश्री. हेमंत टकले,** धनंजय मुंडे, किरण पावसकर, आनंद ठाकूर, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री. विक्रम काळे, सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. अनिकेत तटकरे, प्रकाश गजभिये, रामराव वडकुते, अरुणकाका जगताप, ख्वाजा बेग, अब्दुल्लाखान दुर्राणी, अनिल भोसले, विलास पोतनीस, जयंत पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील वांद्रे पश्चिम येथे नर्गिसदत्त नगर येथील झोपडपट्टीत दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ रोजी भीषण आग लागून या दुर्घटनेत तेथील ८० झोपड्या जळून खाक झालेल्या असणे, या दुर्घटनेत तेथील नागरीकांना धुराची बाधा झाली असून त्यांच्यावर रुग्णालयात सुरु असलेले उपचार, त्यांच्या घरातील संसारोपयोगी वस्तु जळाल्यामुळे त्यांच्या खाण्यापिण्याचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, नर्गिसदत्त नगरमध्ये आगीची चौकशी करुन तेथील बेघर झालेल्या कुटुंबियांना मदत करण्यात यावी अशी मागणी तेथील लोकप्रतिनिधींनी शासनाकडे करणे, या आगीमध्ये एकापाठोपाठ एक अशा तब्बल ७ सिलिंडरचा झालेला स्फोट, त्यामुळे आजूबाजूचा परिसरही हादरुन नागरीकांच्या जिवितास निर्माण झालेला धोका, आग लागलेल्या झोपडपट्टी परिसरात आग विझविण्यासाठी अग्निशमन दलाच्या गाड्यांना जाण्यास रस्ते नसल्याने आगीवर नियंत्रण मिळविण्यास त्यांना आलेल्या अडचणी, या आगीत करोडो रुपयांची मालमत्ता जळून खाक होणे व अनेक झोपडपट्टीधारक बेघर होणे, तसेच या झोपडपट्टीत बेकायदा व विनापरवाना बांगलादेशीय

नागरीकांची असलेली घुसखोरी, ही बेकायदा झोपडपट्टी निष्कासीत करण्यास विभागीय महानगरपालिका अधिकारी व म्हाडाचे संबंधित अधिकारी यांचे कारवाई करण्यात झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री. अशोक ऊर्फ भाई जगताप,** शरद रणपिसे, ॲड. हुस्नबानू खलिफे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात दूध उत्पादक कंपन्या जवळपासच्या खेड्यांमधील शेतकऱ्यांकडून दररोज दूध गोळा करतात मात्र ते ताज दूध ग्राहकांकडे पोहचेपर्यंत त्याचं विषात रुपांतर झालेले असणे, दूधात डिटर्जंट पावडर, युरिया, स्कीम्ड दूध पावडर, कॉस्टीक सोडा, ग्लुकोज, पांढरा रंग, रिफाइंड तेल, मीठ, स्टार्च असे विविध घटक समाविष्ट करुन अनेक समाजकंटक थेट लोकांच्या जीवाशी खेळ खेळीत असणे, डिटर्जंट पावडर, मीठ व ग्लुकोजसारख्या घटकांमुळे दूधात दाटपणा येतो तर स्टार्चमुळे दूध नासण्यास प्रतिबंध होतो त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांना भेसळयुक्त दूध केवळ बघून ओळखता येत नसणे, पोलीस, अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने वेळोवेळी छापे घातल्याने आतापर्यंत दूध भेसळीचे असे अनेक प्रकार उघडकीस आणलेले असणे, परंतु तरीही या प्रश्नी सरकारकडून ठोस कारवाई होत नसणे, दूध भेसळीचे प्रकार राज्यात व छोटया शहरांमध्ये सर्रास सुरु असणे, भेसळयुक्त दूध पुरवणे म्हणजे ग्राहकांवर हळूहळू विषप्रयोग केल्यासारखा प्रकार असणे, दूधात भेसळ करुन काही टोळयांचे समाजकंटक नागरिकांच्या जिवाशी खेळत असल्याने दूधात भेसळ करणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. प्रकाश गजभिये,** विलास पोतनीस, शरद रणपिसे, रामहरी रुपनवर, अशोक ऊर्फ भाई जगताप, जनार्दन चांदूरकर, प्रा. जोगेन्द्र कवाडे, श्री. आनंदराव पाटील, ॲड. हुस्नबानू खलिफे, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. किरण पावसकर, हेमंत टकले, धनंजय मुंडे, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री. जयंत पाटील, अनिकेत तटकरे, जगन्नाथ शिंदे, सतिश चव्हाण, विक्रम काळे, ख्वाजा बेग, अब्दुल्लाखान दुर्राणी, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री. दत्तात्रय सावंत, बाळाराम पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

राज्यातील शासकीय रुग्णालयांना औषध पुरवठा करणाऱ्या औषध

विक्रेत्यांची गत ४ वर्षांपासूनची देयके थकल्यामुळे राज्यातील विविध रुग्णालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर औषधांचा तुटवडा निर्माण झाला असल्याची धक्कादायक बाब दिनांक ८ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, नागपूरात मेयो रूग्णालय व शासकीय मेडिकल रूग्णालयामध्ये श्वान चावल्यामुळे त्यावर उपाय म्हणून देण्यात येणारी ॲन्टीरेबिज लस व इतर औषधे गेल्या काही महिन्यांपासून उपलब्ध नसणे, तसेच ग्रामीण भागातील रुग्णालयात हिमोफिलिया रुग्णांसाठी लाईफ सेव्हिंग ठरणारी फॅक्टर आठ, नऊ, सात व थिबासाठीची इंजेक्शन व औषधांची खरेदी प्रक्रिया रखडल्यामुळे हिमोफिलिया रुग्णांसमोर जीवनमरणाचा प्रश्न निर्माण झालेला असून त्याचा फटका राज्यातील ४२५७ रुग्णांना बसणे, दारिद्रय रेषेखालील रूग्णांसह इतरही रूग्णांना त्यामुळे रिकामे परतावे लागणे, राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयांकडून खरेदी करण्यात आलेल्या औषध आणि उपकरण यांची देयके राज्य शासनाकडे पाठविण्यात येणे, अशा सर्व महाविद्यालये आणि रुग्णालयांची देयके एकत्रित करून राज्य शासनाकडून रक्कम मंजूर करण्यात येणे, परंतु गत ४ वर्षांपासून राज्यातील शासकीय महाविद्यालये आणि रुग्णालये यांनी खरेदी केलेल्या औषधे आणि उपकरणांची देयके पाठविली असतानाही राज्य शासनाकडून अद्यापपर्यंत थकबाकी प्राप्त झालेली नसणे, परिणामी अनेक औषध कंपन्या व विक्रेत्यांनी शासनाला नेमून दिलेल्या औषधांचा पुरवठा करणे बंद केलेले असणे, त्यामुळे सद्य:स्थितीत राज्याच्या ग्रामीण भागासह शहरी भागातील शासकीय रुग्णालयांत मोठ्या प्रमाणावर औषधांची कमतरता निर्माण झाली असल्याने त्याचा भुर्दंड राज्यातील लाखो गोर-गरीब रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना सहन करावा लागणे, हाफकिन औषध खरेदी महामंडळातील सावळ्या गोंधळामुळे राज्यातील सर्वच सरकारी दवाखान्यामध्ये औषधांचा तीव्र तुटवडा निर्माण होणे, औषध खरेदीची जबाबदारी हाफकीनच्या व्यवस्थापकीय संचालिका यांच्याकडे असून त्यांना पुरेसा अधिकारी वर्ग आणि औषध खरेदीसाठी ५७९ कोटी रुपये देण्यात येणे, मात्र नियोजनाअभावी हाफकीन महामंडळाने फक्त १७० कोटींचीच औषधे खरेदी करणे, परिणामी, रुग्णांना अतोनात हाल सहन करावा लागत असणे, रुग्णांच्या जीविताशी निगडित औषधांसारख्या विषयातील अशाप्रकारची शासकीय दिरंगाई होण्यामागे अवास्तव हितसंबंध असल्याच्याही तक्रारी शासन स्तरावर प्राप्त झालेल्या असणे, त्यामुळे या प्रकरणी रुग्णांच्या जीविताशी खेळणारी अक्षम्य दिरंगाई होण्यामागील नेमक्या कारणांचा शोध घेण्यासाठी

तातडीने चौकशी करण्यात यावी व संबंधिताविरुध्द कारवाई करावी, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०१८ वा त्या सुमारास शासनाला केलेली असणे, पुरवठादार व औषध कंपन्यांची थकित देयके तातडीने अदा करण्याची होत असलेली मागणी, या पार्श्वभूमीवर रुग्णांमध्ये व त्यांच्या नातेवाईकांमध्ये पसरलेला असंतोष, त्याकडे शासनाचे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे,** ॲड. अनिल परब, सर्वश्री. रविंद्र फाटक, विलास पोतनीस, विप्लव बाजोरिया, गोपीकिसन बाजोरिया, शरद रणपिसे, अमरनाथ राजूरकर, प्रा. जोगेन्द्र कवाडे, सर्वश्री. रामहरी रुपनवर, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुभाष झांबड, ॲड. हुस्नबानू खलिफे, डॉ. वजाहत मिर्झा, श्री. जनार्दन चांदूरकर, आर्कि. अनंत गाडगीळ, सर्वश्री. जगन्नाथ शिंदे, अनिल भोसले, धनंजय मुंडे, हेमंत टकले, अनिकेत तटकरे, सतिश चव्हाण, विक्रम काळे, ख्वाजा बेग, अब्दुल्लाखान दुर्राणी, किरण पावसकर, आनंद ठाकूर, ॲड. राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. प्रकाश गजभिये, रामराव वडकुते, अरुणकाका जगताप, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुण्यातील मुठा उजव्या कालव्याची भिंत दिनांक २७ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या सुमारास फुटल्याने सिंहगड रस्त्यावर पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होऊन दांडेकर पूल, जनता वसाहत आणि दत्तवाडी, भागातील झोपड्यांमध्ये प्रचंड प्रमाणात कालव्याचे पाणी शिरल्यामुळे तेथील झोपड्या व घरे कोसळून तेथील रहिवाश्यांचे उद्‌स्थ झालेले संसार, मोठ्या प्रमाणात उडालेला हाहाकार, यात सुमारे ९८० जण पूर्णपणे बेघर झालेले असणे, अनेक घरांमध्ये पाणी शिरुन त्यांचे अतोनात नुकसान होणे, विद्यार्थ्यांची तसेच नागरिकांची महत्वाची कागदपत्रे, संसार वाहून जाणे, खडकवासला कालवा अनेक ठिकाणी धोकादायक असल्याची नोंद प्रत्येक महिन्यात करण्यात येणाऱ्या तपासणी अहवालात होत असतांना अशा धोकादायक कामाच्या दुरुस्तीसाठी पाटबंधारे विभागाकडून गेल्या पाच वर्षात एक दमडीचाही खर्च न झाल्याची धक्कादायक बाब समोर येणे, त्याचबरोबर सदरचा कालवा फूटून धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे निवेदन माहे फेब्रुवारी, २०१८ च्या सुमारास शिवसेना पदाधिकाऱ्यानी संबंधित अधिकाऱ्यांकडे देणे, सदरच्या कालव्याची भिंत ही उंदीर, घुशी व खेकडयांमुळे फुटल्याचे सांगण्यात येऊन संबधित दोषी अधिकाऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न असणे, तसेच वीज वितरण विभाग,

महानगरपालिका आणि खाजगी केबल कंपन्या यांनी केलेली बांधकामे याबाबत टीओआर चौकशीचे मुद्दे अंतर्भाव करुन एक महिन्यात चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले असून या समितीची घोषणा व काळाची मर्यादाही स्पष्ट करण्यात न येणे, पुन्हा त्याच कालव्याची भिंत कोसळण्याची घटना माहे ऑक्टोबर, २०१८ च्या तिसऱ्या आठवड्यात घडणे, परिणामी नांदेड फाटा कालवा, लगडमळा, आंबेडकरनगर, सिंहगड रस्ता, सावित्रीबाई फुले वसाहत, डायस प्लॉट, शंकरशेठ रस्ता, गोळीबार मैदान येथील कालवा, पूलगेट येथील कालवा, भैरोबा नाला या कालव्याच्या परिसरातील नागरिकांमध्येही निर्माण झालेले भितीचे वातावरण, मुठा कालव्यामुळे बाधित झालेल्या नागरिकांच्या पुनर्वसनाचा सुमारे ३ कोटीचा प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला असूनही त्यावर अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, या कालवा फुटीची विभागीय चौकशी करण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने माहे ऑक्टोबर, २०१८ च्या सुमारास शासनास देणे, परिणामी पूरबाधित नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याकरिता शासनाने तातडीने या पूरबाधितांचे पुनर्वसन तसेच नागरिकांची महत्वाची कागदपत्रे मिळण्याकरिता समाधान शिबिराचे आयोजन करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनीद्वारे मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०१८ च्या सुमारास करण्यात येणे, या मागणीनुसार तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(५) **प्रा. अनिल सोले,** सर्वश्री. नागोराव गाणार, रामदास आंबटकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र राज्य व इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळातील अधिकारी/कर्मचारी यांना सुधारीत सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळण्याबाबत कर्मचाऱ्यांनी मागणी करूनही सदर कार्यरत कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना सदर पदावर सलग सेवा १२ वर्षांपेक्षा अधिक काळ लोटूनही अद्याप लाभ न मिळणे, त्यामुळे सदर अन्यायग्रस्त कर्मचाऱ्यांना आश्वासित योजनेचा लाभ मिळण्याबाबत लोकप्रतिनिधी या नात्याने मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ७ मे, २०१८ ला लेखी पत्र देण्यात आले असता दिनांक २३ मे, २०१८ ला तात्काळ कार्यवाहीचे निर्देश देण्यात येणे,

त्यातच विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री यांना दिनांक १९ सप्टेंबर, २०१७, २३ नोव्हेंबर, २०१७ व २१ मार्च, २०१८ ला लेखी पत्र दिले असता कार्यवाहीचे निर्देश महामंडळाला देऊनही अद्याप कर्मचाऱ्यांना लाभ न दिला जाणे, त्यातच वित्त व नियोजन मंत्री यांना पत्र दिले असता त्यावर तातडीने कार्यवाही निर्देश दिल्यानंतर सदर फाईल वित्त विभागाकडे सादर केली जाणे, परंतु अद्यापही आश्वासित योजनेचा लाभ सदर कर्मचाऱ्यांना लागू न होणे, वास्तविक पहाता दिनांक १ एप्रिल, २०१० व १ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयाप्रमाणे एकाच पदावर सलग सेवा १२ वर्षे पूर्ण झालेल्या अधिकारी व कर्मचारी यांना सदर योजनेचा लाभ घेण्याचा अधिकार असतांना सुध्दा जाणून बुजून दुर्लक्ष करून वंचित ठेवले जाणे, त्यामुळे सदर मंडळातील ४० कर्मचारी आश्वासित योजनेपासून वंचित असणे, त्यामुळे मंडळातील कर्मचाऱ्यांना तातडीने आश्वासित योजनेचा लाभ लागू करण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास).**

## - मध्यंतर -

**सहा : शासकीय विधेयके :-**

**(क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

"**सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ३६ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८**"

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ३६ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| (१) पणन मंत्री. | (२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स. |
| (३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. | (४) श्री.प्रसाद लाड, वि.प.स. |
| (५) श्री.हेमंत टकले, वि.प.स. | (६) श्री.अशोक ऊर्फ भाई |

जगताप, वि.प.स.

(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स. (८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.

(९) ॲड.अनिल परब, वि.प.स. (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार पुढे सुरू, खंडश: विचार व संमत करणे.**

**"सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ३८ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१८"**

---

**सात** : **श्री. सुरेश धस,** ॲड. अनिल परब, श्री. प्रविण दरेकर, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, सर्वश्री.निलय नाईक, गोपीकिसन बाजोरिया, प्रा.अनिल सोले, श्री.रविंद्र फाटक, श्रीमती स्मिता वाघ, प्रा.डॉ.तानाजी सावंत, सर्वश्री. रामराव पाटील, नरेंद्र दराडे, प्रसाद लाड, विप्लव बाजोरिया, सुजितसिंह ठाकूर, विलास पोतनीस, अरुणभाऊ अडसड, डॉ.मनिषा कायंदे, डॉ.परिणय फुके, सर्वश्री. रामदास आंबटकर, चंदुभाई पटेल, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री. रमेश पाटील, विजय ऊर्फ भाई गिरकर, गिरीशचंद्र व्यास, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"सन २०१८ च्या खरीप हंगामामध्ये राज्यातील २६ जिल्हयांमध्ये गंभीर दुष्काळ व ११२ तालुक्यांमध्ये मध्यम दुष्काळ दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ पासून राज्य शासनाने घोषित केला असणे, दुष्काळाचे नैसर्गिक संकट दुर करण्याच्या दृष्टीने व दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना सोयी-सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याकरिता राज्य शासनाकडून मंत्रीमंडळ उपसमिती नेमण्यात आली असणे, मा. मुख्यमंत्री व मंत्रीमंडळातील त्यांच्या अनेक सहकारी मंत्र्यांनी दुष्काळी भागाचा दौरा करुन व स्थानिक प्रशासनाकडून तेथील नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांची प्रत्यक्ष पाहणी करुन दुष्काळाचा सामना युध्दपातळीवर करण्याच्या दृष्टीने प्रशासनास दुष्काळ निवारण्याची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याकरिता आदेश देण्यात आले असणे, दुष्काळ निवारण्याकरिता केंद्राकडून आर्थिक मदत मिळविण्याचे शासनाचे प्रयत्न असणे, केंद्राच्या 'नॅशनल सेंटर फॉर क्रॉप फोरकास्टींग' या संस्थेकडून राज्यातील सर्व गावांतील पाण्याची सद्यःस्थिती, पाण्याची पातळी, पिकांची परिस्थिती इत्यादी सर्व बाबींचे उपगृहाच्या माध्यमातून सर्वेक्षण करुन त्याप्रमाणे दुष्काळ निवारण्याचे कार्य कार्यान्वित करण्यात आले असणे,

राज्यातील २० हजार गावांमध्ये पिकांची आणेवारी सरासरी ५० पैशांपेक्षा कमी असून सुमारे २०० तालुक्यांवर दुष्काळचे सावट असणे, विशेषतः मराठवाडयात अत्यल्प पाऊस झाल्याने मराठवाडयातील ८ हजार ५२५ गावांपैकी ३ हजार ५७७ म्हणजे ४२ टक्के गावांची आणेवारी ५० पैशांपेक्षा कमी असणे, विद्यमान शासन सत्तेत आल्यानंतर मराठवाड्यातील दुष्काळी पट्ट्यासाठी सुमारे ८ हजार कोटी रुपये खर्च करण्यात येणे, मराठवाडयात जलयुक्त शिवाराची कामे मोठया प्रमाणावर होऊनही त्या भागात पाऊस न झाल्याने व त्यामुळे जलयुक्त शिवारामध्ये पाणी जमा होऊ न शकल्याने त्या भागात पाण्याची भीषण समस्या निर्माण होणे, राज्याच्या विविध भागातील पर्जन्यमान, पीक परिस्थिती, भूजल पातळी आदींची माहिती एकत्रित करुन त्यांचे विश्लेषण करण्यासाठी व त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाकडून 'महामदत' या संकेतस्थळाची निर्मिती करण्यात येणे, राज्यातील आत्महत्याग्रस्त दुष्काळी जिल्हयांकरिता नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेंतर्गत ३०० कोटींच्या वार्षिक कृती आराखडयास प्रशासकीय मंजुरी देण्यात येऊन तो कार्यान्वित केला असणे, या प्रकल्पांतर्गत मराठवाडा व विदर्भातील क्षारयुक्त जमीन असणाऱ्या गावांमध्ये शेतकऱ्यांचे कृषी उत्पन्न वाढविण्यासाठी आणि गावातील जमीनीचे मृद संवर्धन करण्यासाठी नियोजन करण्यात येणे, दुष्काळ जाहीर झालेल्या तालुक्यांमध्ये जमीन महसुलातून सुट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेती निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषीपंपाच्या चालु बिलामध्ये ३३.५ टक्के सुट, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी, एसटी प्रवास सवलत, रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकरचा वापर व टंचाई जाहीर झालेल्या गावांमध्ये शेतक-यांच्या शेतपंपाची वीज जोडणी खंडित न करणे इत्यादी बाबीं राज्य शासनाकडून जाहीर झाल्या असणे, नैसर्गिक असमतोलपणामुळे राज्यात निर्माण होणाऱ्या दुष्काळावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी व शेतक-यांना कर्ज घेण्याची आवश्यकता न पडता त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी शासनाकडून दुरगामी धोरण आखण्यात येणे, जलयुक्त शिवाराची संकल्पना अंमलात आणून राज्यातील बहुतांश भागातील पाण्याचे दुर्भिक्ष कमी करण्याचा शासनाचा प्रयत्न, दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना अधिकाधिक सोयी-सुविधा देण्याच्या दृष्टीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**आठ : अर्धा-तास चर्चा – म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) –**

**(१) डॉ. (श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.**

"**राज्यात बोंडअळीमुळे बाधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत**" या विषयावरील डॉ. (श्रीमती) नीलम गोऱ्हे व इतर वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ४२८६७ ला दिनांक ६ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(२) श्री. नागोराव गाणार, वि.प.स.**

"**राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील कार्यरत शिक्षकांच्या सेवाज्येष्ठतेबाबत**" या विषयावरील श्री.नागोराव गाणार व इतर वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ४२३७० ला दिनांक ९ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १९ नोव्हेंबर, २०१८.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.